शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
परिपत्रक
**अतितातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये व परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय- Dashboard च्या माहितीबाबत.

संदर्भ- १. या कार्यालयाचा दि. ०८/०४/२०२४ रोजीचा ई मेल
२. या कार्यालयाचे संदर्भ क्र. १४३२ दि.१६/०४/२०२४ रोजीचे परिपत्रक

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून आपणास उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय, मुंबई यांचेकडून Dashboard बाबतची माहिती महाविद्यालयांकडून भरून घेणेबाबत लिंक दिली होती. याबाबत बऱ्याच महाविद्यालयाकडून कोणतीही माहिती अवगत झालेली नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे. तसेच, काही महाविद्यालयांनी यापुर्वी माहिती भरली आहे. तथापि, सदरची माहिती अचूक नाही. याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी Dashboard ची माहिती यापुर्वी भरलेली आहे अशा महाविद्यालयांनी सदर माहितीची प्रिंट प्राचार्यांच्या सहीने विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे. तसेच, अद्यापही ज्या महाविद्यालयांनी सदरची माहिती भरलेली नाही अथवा अचूक भरलेली नाही अशा महाविद्यालयांनी तात्काळ सदरची माहिती भरावी. अन्यथा अशा महाविद्यालयांची संलग्नीकरणाचे मान्यता पत्र तसेच, अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. - संलग्नता/टी-२/ - 1652
दिनांक - 06 JUL 2024

F:\23.04.2021\sm\sm\Circular\Circular 2019.1.docx